SPANDAN Career Institute
The way of Success...
Since 2008
MOB.9923262977
स्पंदन करिअर इन्स्टीट्युट

## STATE SERVICE PRELIMINARY EXAM SYLLABUS (राज्यसेवा (पूर्व) परीक्षा अभ्यासक्रम)

| | **Paper I – (200 marks) (100 Questions)** |
|---|---|
| 1 | Current events of state, national and international importance.<br>राज्य, राष्ट्रीय आणि आंतराष्ट्रीय स्तराच्या महत्वाच्या घटना |
| 2 | History of India (with special reference to Maharashtra) and Indian National Movement.<br>भारताचा इतिहास (महाराष्ट्राच्या विशेष संदर्भासह) आणि भारतीय राष्ट्रीय चळवळ. |
| 3 | Maharashtra, India and World Geography – Physical, Social, Economic Geography of Maharashtra, India and the World.<br>महाराष्ट्र, भारत आणि जगाचा भूगोल - महाराष्ट्राचा प्राकृतिक, सामाजिक, आर्थिक भूगोल, भारत आणि जग. |
| 4 | Maharashtra and India – Polity and Governance – Constitution, Political System, Panchayati Raj, Urban Governance, Public Policy, Rights issues, etc.<br>महाराष्ट्र आणि भारत - राजनीती आणि शासन - संविधान, राजकीय व्यवस्था, पंचायतराज, नागरी शासन, सार्वजनिक धोरण, अधिकार मुद्दे इत्यादी. |
| 5 | Economic and Social Development – Sustainable Development, Poverty, Inclusion, Demographics, Social Sector initiatives, etc.<br>आर्थिक आणि सामाजिक विकास - शाश्वत विकास, गरीबी, समावेश जनसांख्यिकी, सामाजिक क्षेत्रातील पुढाकार, इत्यादी. |
| 6 | General issues on Environmental Ecology, Bio-diversity and Climate Change-that do not require subject specialisation.<br>पर्यावरणातील परिस्थितीकीय, जैवविविधता, हवामान बदला संबंधी सामान्य विषय ज्याला विषयाचे सखोल ज्ञान असण्याची आश्यकता नाही. |
| 7 | General Science. / सामान्य विज्ञान |
| | **Paper II – (200 marks) (80 Questions)** |
| 1 | Comprehension / आकलन |
| 2 | Interpersonal skills including communication skills. / वैयक्तिक कौशल्य संवाद कौशल्यासह. |
| 3 | Logical reasoning and analytical ability. / तर्कशुध्द आणि विश्लेषणात्मक क्षमता. |
| 4 | Decision – making and problem- solving. / निर्णय निर्धारण आणि समस्येचे निराकरण |
| 5 | General mental ability. / सर्वसामान्य मानसिक क्षमता. |
| 6 | Basic numeracy (numbers and their relations, orders of magnitude, etc.) **(class X level),** Data interpretation (Charts, graphs, tables, data sufficiency etc.- **class X level**)<br>मूलभूत संख्याशास्त्र, माहिती पृथक्करण. |
| 7 | Marathi and English Language Comprehension skills **(class X/XII level)**<br>मराठी आणि इंग्लिश भाषेचे आकलन कौशल्य. |

**Note1 :**
Questions relating to Marathi and English Language Comprehension skill of Class X/XII level (last item in the syllabus of Paper II) will be tested through passage from Marathi and English language without providing cross translation thereof in the question paper.

**Note 2 :**
The question will be of multiple choice, objective type./ प्रश्नांचे स्वरूप हे वस्तुनिष्ठ बहुपर्यायी असते.

**Note 3 :**
It is mandatory for the candidate to appear in both the Papers of State Service (Prelim) Examination for the purpose of evaluation. Therefore a candidate will be disqualified in case he / she does not appear in both the papers of State Service (Prelim) Examination**.**

# STATE SERVICE MAINS EXAM SULLABUS

## राज्यसेवा मुख्य परीक्षा अभ्यासक्रम

### -: परीक्षा योजना :-

**परीक्षेचे टप्पे** :– लेखी परीक्षा – 800 गुण, **मुलाखत**–100 गुण
**प्रश्नपत्रिकांची संख्या**:– सहा (अनिवार्य)

| पेपर क्र.व संकेतांक | विषय | गुण | प्रश्न संख्या | दर्जा | माध्यम | कालावधी | प्रश्नपत्रिकेचे स्वरूप |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ (अनिवार्य) (संकेतांक क्र०४२) | **मराठी** | ५० | —— | उच्च माध्यमिक शालांत परीक्षा | मराठी | तीन तास | पारंपारिक/ वर्णनात्मक |
| | **इंग्रजी** | ५० | —— | उच्च माध्यमिक शालांत परीक्षा | इंग्रजी | | |
| **पेपर क्र.१ मधील दोन्ही विषयांसाठी एकच संयुक्त प्रश्नपत्रिका राहील. मात्र दोन्ही भागांसाठी दोन स्वतंत्र पुस्तिका राहतील.** | | | | | | | |
| २ (अनिवार्य) (संकेतांक क्र०४३) | **मराठी** | ५० | —— | पदवी | मराठी | एक तास | वस्तुनिष्ठ बहुपर्यायी |
| | **इंग्रजी** | ५० | —— | पदवी | इंग्रजी | | |
| **पेपर क्र.२ मधील दोन्ही विषयांसाठी एकच संयुक्त प्रश्नपुस्तिका राहील.** | | | | | | | |
| ३ (अनिवार्य) (संकेतांक क्र०३१) | सामान्य अध्ययन (पेपर–१) | १५० | १५० | पदवी | मराठी व इंग्रजी | दोन तास | वस्तुनिष्ठ बहुपर्यायी |
| ४ (अनिवार्य) (संकेतांक क्र०३२) | सामान्य अध्ययन (पेपर–२) | १५० | १५० | पदवी | मराठी व इंग्रजी | दोन तास | वस्तुनिष्ठ बहुपर्यायी |
| ५ (अनिवार्य) (संकेतांक क्र०३३) | सामान्य अध्ययन (पेपर–३) | १५० | १५० | पदवी | मराठी व इंग्रजी | दोन तास | वस्तुनिष्ठ बहुपर्यायी |
| ६ (अनिवार्य) (संकेतांक क्र०३४) | सामान्य अध्ययन (पेपर–४) | १५० | १५० | पदवी | मराठी व इंग्रजी | दोन तास | वस्तुनिष्ठ बहुपर्यायी |

—:अभ्यासक्रम:—

| पेपर क्रमांक-१ मराठी व इंग्रजी (पारंपारिक/वर्णात्मक) | |
|---|---|
| **क्रमांक** | **विषय** |
| १. | भाग—१— मराठी (एकुण—५० गुण) |
| | निबंध लेखन — दोनपैकी एका विषयावर सुमारे ४०० शब्द |
| | भाषांतर— इंग्रजी उताऱ्याचे मराठीत भाषांतर, सुमारे अर्धे पान/ २परिच्छेद |
| | सरांश लेखन |
| २. | भाग—२— इंग्रजी (एकुण—५० गुण) |
| | 1) Essay writing – An essay one out of the two given topics/subjects(about 400 words) |
| | 2) Translation – Marathi Paragraph to be translated into English, Approximately ½ page 2 Paragraphs |
| | 3) Precis writing |

| पेपर क्रमांक-२ मराठी व इंग्रजी (वस्तुनिष्ठ/बहुपर्यायी) | |
|---|---|
| **क्रमांक** | **विषय** |
| | **मराठी (एकुण ५० गुण) —** |
| | **व्याकरण — म्हणी, वाक्प्रचार, समानार्थी/विरूध्दार्थी शब्द, शुध्दलेखन/विरामचिन्हे, इत्यादी.** |
| | **आकलन — उताऱ्याखालील प्रश्नांची उत्तरे लिहणे.** |
| | **English (एकुण—५० गुण)** |
| | **Grammar** – Idioms, Phrases, Synonyms/Antonyms, Correct formation of words and sentence, Punctuation, etc |
| | **Comprehension** |

# अभ्यासक्रम
# राज्यसेवा (मुख्य) परीक्षा
# सामान्य अध्ययन – एक
# इतिहास व भूगोल

**दर्जा** :– पदवी | **एकूण गुण** : 150

**प्रश्नपत्रिकेचे स्वरूप** – वस्तुनिष्ठ | **कालावधी** : २ तास

**टीप :**

(१) प्रश्नपत्रिकेतील प्रश्नांचे स्वरूप आणि दर्जा अशा प्रकारचा असेल की, एखादी सुशिक्षित व्यक्ती कोणताही विशेष अभ्यास न करता उत्तर देऊ शकेल; विविध विषयातील उमेदवारांच्या सामान्यज्ञानाची चाचणी घेणे हा त्याचा उद्देश आहे.

(२) उमेदवारांनी खाली नमूद केलेल्या विषयांतील / उपविषयांतील अद्ययावत व चालू घडामोडींचा अभ्यास करणे अपेक्षित आहे.

---

**१. इतिहास :**

१ **आधुनिक भारताचा विशेषतः महाराष्ट्राचा इतिहास (१८१८–१८५७) :** आधुनिक शिक्षणाची ओळख – वृत्तपत्रे, रेल्वे, टपाल व तार, उद्योगधंदे,जमीन सुधारणा – धार्मिक सुधारणा – यांचा समाजावरील परिणाम.

१.१ **ब्रिटीश सत्तेची भारतामध्ये स्थापना :** प्रमुख भारतीय सत्तांच्या विरूध्द युध्दे, तैनाती फौज धोरण, खालसा धोरण, १८५७ पर्यंतची ब्रिटीश राज्याची रचना.

१.२ **सामाजिक – सांस्कृतिक बदल :** ख्रिचन मिशनबरोबरचे संबंध, इंग्रजी शिक्षण व मुद्रणालयाचे आगमन, अधिकृत सामाजिक सुधारनांचे उपाय (१८२८–१८५७), सामाजिक – धार्मिक सुधारणाच्या चळवळी: ब्रहमो समाज, प्रार्थना समाज, सत्यशोधक समाज, आर्य समाज, शीख तसेच मुस्लिम धर्मीयातील सुधारणा चळवळी, डिप्रेस्ड क्लासेस मिशन, ब्राम्हणेत्तर चळवळ व जस्टीस पार्टी.

१.४ **सामाजिक व आर्थिक जागृती :** भारतीय राष्ट्रवाद – १८५७ चा उठाव आणि त्यानंतर, इंडियन नॅशनल कॉंग्रेस (१८२८–१८५७), आझाद हिंद सेना, महत्वाच्या व्यक्तींची भूमिका, स्वातंत्र्यपूर्व भारतातील सामाजिक जागृतीमधील वृत्तपत्रे व शिक्षण यांची भूमिका.

१.५ **भारतीय राष्ट्रवादाची निर्मिती व विकास:** सामाजिक पार्श्वभूमी, राष्ट्रीय संघटनांची स्थापना, शेतकऱ्यांचे उठाव, इंडियन नॅशनल कॉंग्रेसची स्थापना, मवाळ गटाची वाढ, मोर्ले–मिंटो सुधारणा, स्वराज्याची चळवळ, लखनौ करार, मॉट–फोर्ड सुधारण.

१.६ **गांधी युगातील राष्ट्रीय चळवळ :** गांधीजींचे नेतृत्व आणि प्रतिकाराचे तत्व, गांधीजींच्या लोक चळवळी, असहकार, सविनय कायदेभंग, वैयक्तिक सत्याग्रह, चलेजाव चळवळ, सत्यशोधक समाज, गांधीची आणि अस्पृश्यता निर्मूलन, डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा अस्पृश्यांच्या समस्येबाबतचा दृष्टिकोन, मुस्लिम राजकारण आणि स्वातंत्र्य चळवळ (सर सय्यद अहमद खान व अलिगढ चळवळ, मुस्लिम लीग व अली बंधू, इक्बाल, जिना), संयुक्त पक्ष (युनियनिस्ट पार्टी) व कृषक प्रजा पार्टी, हिंदू महासभेचे राजकारण, साम्यवादी नेते आणि भारतीय स्वातंत्र्य चळवळ, कॉंग्रेस समाजवादी पार्टी, राष्ट्रीय चळवळीतील महिला सहभाग, संस्थानातील जनतेची चळवळ, साम्यवादी (डावी) चळवळ – शेतमजुरांची चळवळ – आदीवासींचे बंड, ट्रेड युनियन चळवळ व आदीवासी चळवळ

१.७ **स्वातंत्र्योत्तर भारत :** फाळणीचे परिणाम, संस्थानांचे विलीनीकरण, भाषावर प्रांतरचना, नेहरूंचे अलिप्ततेचे धोरण, संयुक्त महाराष्ट्र चळवळ : त्यात सहभागी झालेले महत्वाचे राजकिय पक्ष व व्यक्ती, शेजारील राष्ट्रांशी संबंध, आंतरराष्ट्रीय राजकारणामधील भारताची भूमिका, कृषि, उद्योगधंदे, शिक्षण, विज्ञान व तंत्रज्ञान यामधील प्रगती, इंदिरा गांधींच्या नेतृत्वाचा उदय, बांगला देशाची मुक्ती, इंदिरा गांधीच्या आणि आणीबाणी, पंजाब व असामधील दहशदवाद, नक्षलवाद व माओवाद, पर्यावरण चळवळ व वांशिक चळवळ

१.८ **महाराष्ट्रातील निवडक समाजसुधारक –** त्यांची विचारप्रणाली व कार्य : गोपाळ गणेश आगरकर, महात्मा फुले, मा.गो.रानडे, प्रबोधनकार ठाकरे, महर्षि कर्वे, राजर्षि शाहु महाराज, महर्षि विठ्ल शिंदे, बाबासाहेब आंबेडकर, लोकमान्य टिळक, महात्मा गांधी, विनोबा भावे, विनायक दा. सावरकर, अण्णाभाऊ साठे, क्रांतीकारी नाना पाटील, लहूजी साळवे, कर्मवीर भाऊराव पाटील.

१.९. **महाराष्ट्रचा सांस्कृतिक वारसा (प्राचीन तें आधूनिक) –** प्रायोगिक कला (नृतय, नाटक, चित्रपट, संगीत व लोककला, लावणी , तमाशा, पोवाडा, भारूड व इतर लाकनृत्ये) आणि उत्सव, महाराष्ट्राच्या सामाजिक व मानसिक विकासावरील वाङ्मयाचा प्रभावः, भक्ती वाङ्मय, नागरी व ग्रामीन वाङ्मय

## २. भूगोल महाराष्ट्राच्या विशेष संदर्भासह

**२.१ प्राकृतिक भूगोल** : पृथ्वीचे अंतरंग– रचना व प्राकृतिक जडण घडण, भूरूप विकास नियंत्रित करणारे घटक, भूरूपिक चक्रांची संकल्पना – नदीसंबधी, शुष्क, हिम, समुद्रतटीय चक्र यांच्याशी संबधित भूरूप. भारतीय उपखडांची उत्कांती व भूरूपवर्णन, महत्वाचे भूरूपकीय प्रदेश– पूरांची समस्या – महाराष्ट्राचा, हिंद महासागराच्या, आशियाच्या व जगाच्या संदर्भातील मोक्याचे ठिकाण.

**२.२ महाराष्ट्रचा आर्थिक भूगोल :** खनिजे व ऊर्जासाधनसंपत्ती: महाराष्ट्रातील खनिज संपत्तीचे वितरण, महत्व व विकास, महाराष्ट्रातील पर्यटन – धार्मिक पर्यटन, वैद्यकीय पर्यटन, पर्यावरणाभिमुख (इको) पर्यटन व सांस्कृतिक वारसा, महाराष्ट्रातील संरक्षित वने, अभयारण्ये, राष्ट्रीय उद्याने व किल्ले, व्याघ्र प्रकल्प.

**२.३ महाराष्ट्राचा मानवी व सामाजिक भूगोल** : जनतेचे स्थलांतर – कारणे व परिणाम, उसतोडणी कामगार साधनसंपती व ज्या प्रदेशात स्थलांतर होते त्या प्रदेशावरील स्थलांतराचा परिणाम, महाराष्ट्रातील ग्रामीण वस्त्या, शहरी व ग्रामीण वस्त्यांमधील समस्या, पर्यावरण, व गृहनिर्माण, झोपडपटटी, पाणीपूरवठा व स्वच्छता, शहरी वाहतुक व प्रदूषण.

**२.४ पर्यावरणीय भूगोल :** परिस्थितीविज्ञान व परिस्थितिक व्यवस्था – ऊर्जा प्रवाह, वस्तु चक्र, अन्न श्रृंखला व वेब्ज, पर्यावरणीय अवनतीव संवर्धन जागतिक परिस्थितिक असमतोल – प्रदुषण व हरीतगृह परिणाम, हरीतगृह परिणामातील कार्बन डायऑक्साईडची व मिथेन ची भूमिका, जागतिक तापणातील वाढ, जैवविविधतेतील घट आणि वनांचा ऱ्हास, पर्यावरण संरक्षणाबाबतत कायदे व पर्यावरणीय प्रभावाचे परिक्षण, क्योटो, प्रोटोकॉल व कार्बन केडिटस, शहरी कचरा व्यवस्थापन, सागरी संरक्षित क्षेत्र एक व सागरी संरक्षित क्षेत्र दोन

**२.५ जन, भूगोलशस्त्र (महाराष्ट्राच्या संदर्भात) :** स्थलांतराचे कारणे व परिणाम, ग्रामीण व शहरी वसाहती – ठिकाण, परिस्थिती, प्रकार, आकारमान, मोकळया जागा व भूरूपिकीय स्वरूप, शहरीकरण प्रक्रिया व समस्या, ग्रामीण – शहरी किनार, शहरी प्रवाहचे क्षेत्र, प्रादेशिक असमतोल

**२.६ सुदूर संवेदना :** सुदूर संवेदनाची संकल्पना भारतीय सुदूर संवेदना उपग्रह कल्पनाचित्र, भारतीय सुदूर संवेदनास उपग्रह निर्मिती, एमएसएस बॅन्ड – निळा, हिरवा, लाल व लालसर रंगाच्या जवळचा, आभासी रंग मिश्रक {फास्ट कलर कॉम्पझिट (एफसीसी)}. नैसर्गिक साधन संपत्तीसह सुदूर संवेदनाचा वापर करणे. भौगोलिक माहीती यंत्रणा (जीआयएस) व जागतिक स्थाननिश्चिती यंत्रणा (जीपीएस) सुरू करणे.

## ३. भूगोल व कृषि

**३.१ कृषि परिस्थितीकी** : कृषि परिस्थितीकी व त्याचा मानवाशी नैसर्गिक साधनसंपत्तीशी संबध , त्याच्या कायमस्वरूपी व्यवस्थापन व संवर्धन, पिक वितरण व उत्पादनाचे घटक म्हणून प्राकृतिक व सामाजिक पर्यावरण, पिक वाढीचे घटक म्हणून हवामान घटक , पर्यावरणीय प्रदूषण व पीके, प्राणी व मानव यांच्या संबधातील धोके.

**३.२ हवामान** : वातावरण – रचना व संरचना, सौर उत्सर्जन व उष्मा समतोल, हवामानाचे घटक – तापमान वायूदाब, ग्रहीय व स्थायिय वारे, मान्सून, वायुराशी आणि पुरोभाग व चक्रीवादळे, भारतीय मान्सूनचे तंत्र, पावसाचे पुर्वानुमान, पर्जन्यवृष्टी, चक्रीवादळे, अवर्षन व पूर हवामान प्रदेश, महाराष्ट्रातील पर्जन्यवृष्टीचे वितरण– अभिक्षेत्रीय व कालिक परिवर्तनशिलता – महाराष्ट्राचे कृषि हवामान क्षेत्र अवर्षण व टंचाईची समस्या, अवर्षण प्रवण क्षेत्र कार्यक्रम– कृषि उद्योग व घरगुती क्षेत्रातील पाण्याची आवश्यकता, पिण्याच्या पाण्याची समस्या, महाराष्ट्राच्या विविध कृषि हवामान क्षेत्रातील पीक प्ररूप, पीक लागवडीच्या पध्दतीतील बदलांवर उच्च उत्पादनाच्या व कमी वेळातल्या विविध प्रकारच्या पिकांचा प्रभाव, बहुविध पीक लागवडीची संकल्पना व आंतर पीक लागवड व त्याचे महत्व, सेंद्रीय शेतीची आधूनिक संकल्पना, वर्धनक्षम कृषि.

**३.३ मृदा** : मृदा प्राकृतिक, रासायनिक व जैविक गुणधर्म, मृदा तयार होण्याची प्रक्रिया व घटक, खनिजे आणि मातीचे सेंद्रीय घटक आणि मातीची उत्पादकता कायम ठेवण्यामधील त्यांची भूमिका, मातीतील आवश्यक असे वृक्ष लागवडीसाठीचे पोषक घटक आणि इतर लाभदायक घटक आणि समस्याग्रस्त जमीनी व त्या लागवडी योग्य करण्याच्या पध्दती, महाराष्ट्रातील मृदा अपक्षरण व जीमीन ओसाड होणच्या समस्या, जल विभाजकाच्या आधारे मृद संधारणाचे संरक्षण करणे, डोंगराळ, डोंराच्या पायथ्यावरील व दरीतील जमीनीची धूप व पृष्ठवाह व्यवस्थापन, त्यांच्यावर परिणाम करणाऱ्या कार्यपध्दती व घटक.

**३.४ जल व व्यवस्थापन** : सद्य परिस्थिती, जल संधारणाच्या पध्दती व महत्व, पाण्याच्या गुणवतेची मानके, भारतातील नद्यांची आंतजोडणी करणे, पावसाचे पाणी साठवूण ठेवण्याच्या पारंपारिक व अपारंपारीक पध्दती, भूजल व्यवस्थापन– तांत्रिक व सामाजिक बाबी, कृत्रिम भूजल पूनर्भरणाच्या कोरडवाहू जमीनीवरील शेती व त्यातील समस्या, पीक उत्पादनसंबंध्दात पाणी वापराची क्षमता, जलसींचनाचे पाणी वाहुन जाण्याचे प्रमाण कमी करण्याच्या उपाययोजना, ठिबक व तुषार जलसिंचन, पाणथळ मृदेचे जलनिस्सारण, कारखान्यातील दुषित पाण्याचा जमीन व पाणी यावर होणारा परिणाम.

## सामान्य अध्ययन – दोन
## भारतीय संविधान व भारतीय राजकारण
## (महाराष्ट्राच्या विशेष संदर्भासह) व कायदा

**दर्जा** :– पदवी **एकूण गुण** : 150

**प्रश्नपत्रिकेचे स्वरूप** – वस्तुनिष्ठ **कालावधी** : २ तास

**टीप :**

(१) प्रश्नपत्रिकेतील प्रश्नांचे स्वरूप आणि दर्जा अशा प्रकारचा असेल की, एखादी सुशिक्षित व्यक्ती कोणताही विशेष अभ्यास न करता उत्तर देऊ शकेल; विविध विषयातील उमेदवारांच्या सामान्यज्ञानाची चाचणी घेणे हा त्याचा उद्देश आहे.

(२) उमेदवारांनी खाली नमूद केलेल्या विषयांतील / उपविषयांतील अद्ययावत व चालू घडामोडींचा अभ्यास करणे अपेक्षित आहे.

---

१. **भारताचे संविधान :** संविधानाची निर्मिती प्रक्रिया, संविधानाची ठळक वैशिष्टये, उददेशिकेतील तत्वज्ञान (धर्मनिरपेक्ष, लोकशाही आणि समाजवादी), मूलभुत अधिकार व कर्तव्ये, राज्यधोरणाची निदेशक तत्वे, मोफत आणि सक्तीचे प्राथमिक शिक्षण, सामाजिक नागरी संहीता आणि मुलभूत कर्तव्ये, केंद्र राज्य संबध आणि नवीन राज्याची निर्मिती, स्वतंत्र न्याय व्यवस्था सुधारणेची प्रक्रिया आणि संविधानातील प्रमुख सुधारणा: संविधानाचा अर्थ लावताना वापरण्यात आलेले ऐतिहासिक न्यायनिर्णय, प्रमुख आयोग आणि मंडाळाची रचना आणि कार्ये: निवडणूक आयोग, संघराज्य आणि लोकसेवा आयोग, राष्ट्रीय महिला आयोग, मानवी हक्क आयोग, राष्ट्रीय अल्पसंख्यांक अनुसुचित जाती/अनुसुचीत जमाती आयोग– नदी पाणी विवाद निवारण मंडळ,इ.

२. **राजकीय यंत्रणा (शासनाची रचना, अधिकार व कार्ये) :** भारतीय संघराज्याचे स्वरूप – संघराज्य व राज्य– विधीमंडळ, कार्यकारी मंडळ व न्याय यंत्रणा, केंद्र– राज्य संबंध – प्रशासकीय, व कार्यकारी वित्तीय संबंध, वैधानिक अधिकार, विषयांचे वाटप.

१. **केंद्र सरकार :** केंद्रीय कार्यकारी मंडळ राष्ट्रपती, उपराष्ट्रपती, पंतप्रधान व मंत्रिमंडळ – भारताचा महाअधिवक्ता – भारताचा नियंत्रक आणि महालेख परीक्षक

२. **केंद्रीय विधीमंडळ :** संसद, सभापती व उपसभापती, संसदीय समीत्या, कार्यकारी मंडळावरील संसदेचे नियंत्रण

३. **न्यायमंडळ :** न्यामंडळाची रचना, एकात्मीक न्यायमंडळ – कार्ये, सर्वोच्च न्यायालय व उच्च न्यायालयाची भुमिका व अधिकार, दुय्यम न्यायालये– लोकपाल, लोकायुक्त आणि लोक न्यायालय सांविधानिक आदेशाचे रक्षण करणारे न्यायमंडळ, न्यायालीन सक्रियता. जनहित याचिका.

३. **राज्य सरकार व प्रशासन (महाराष्ट्राचा विशेष संदर्भासह) :** महाराष्ट्र राज्याची निर्मिती आणि पुर्नरचना, राज्यपाल, मुख्यमंत्री, मंत्रिमंडळ, मुख्यसचिव, राज्य सचिवालय, संचालनालये, विधानसभा, विधानपरीषद, अधिकार, कार्ये व भूमिका– विधीमंडळ समित्या, मुंबईचा नगरपाल (शेरीफ)

४. **जिल्हा प्रशासन :** जिल्हा प्रशासनसचा विकास, जिल्हा दंडाधिकाऱ्याची बदलती भूमिका कायदा व सुव्यवस्था, कार्यकारी विभागाबरोबरचे संबध जिल्हा प्रशासन व पंचायत संस्था, उपविभागीय अधिकाऱ्याची भूमिका आणि कार्ये.

५. **ग्रमीण अणि नागरी स्थानिक शासन:** ७३ व्या ७४ व्या घटना दुरूस्तीचे महत्व, स्थानिक प्रशासनाचे सबलिकरण व विकासातील त्यांची भूमिका.

१. **ग्रामीण स्थानिक शासन:** जिल्हा परीषद, पंचायत समिती आणि ग्रामपंचायतीची रचना, अधिकार व कार्ये, महाराष्ट्रातील पंचायत राज संस्थेची खास वैशिष्टये पंचायत राज संस्था परिस्थतीचा अहवाल व त्यांच्या कामगीरीचे मूल्यन, ७३ व्या घटनादुरूस्तीची महत्वाची वैशिष्टये, अंमलबजावणीतील अडचणी, प्रुमूख ग्रामीण विकास कार्यक्रम आणि त्यांचे व्यवस्थापन.

२. **नागरी स्थानिक शासन:** महानगरपालिका, नगरपरीषद आणि कटक मंडळाची रचना व कार्ये रचना, अधिकारी, साधनसंपत्ती, अधिकार कार्ये आणि नियंत्रण, ७४ व्या घटनादुरूस्तीची महत्वाची वैशिष्टये: अमलबजावणीतील समस्या, प्रमुख नागरी विकास कार्यक्रम व त्याची व्यवस्थापन.

६. **शिक्षण पध्दती:** राज्य धोरण व शिक्षण याविषयी निदेशक तत्व वंचित घटक – अनूसुचित जाती, अनुसूचित जमाती, मुस्लिम व महिला यांचे शिक्षण विषय प्रश्न शिक्षणाचे खाजगीकरण– शिक्षणाच्या प्रांतात प्रवेश, गुणवत्ता व दर्जा, व सामाजिक न्याय या संबंधीचे मुददे सेवाअंतर्गत व्यवसाय संबंधात सामान्य करार आणि नविन उदभवणारे मुददे उच्च शिक्षणातील आजची आव्हाने, सर्व शिक्षा अभियान, माध्यमिक शिक्षा अभियान.

**७. पक्ष आणि दबाव गट :** पक्ष पध्दतीचे स्वरूप– राष्ट्रीय पंक्षांची भूमिका – विचार प्रणाली, संघटन व निवडणूकीतील कामगिरी – राजकीय पक्ष व त्यांचे सामाजिक आधिष्ठान, प्रादेशिकतावाद,– प्रादेशिक पक्षांचा उदय– विचारप्रणाली संघटन व निवडणूकीतील कामगिरी महाराष्ट्रातील प्रमुख दबाव गट व हितसंबधित गट – त्यांची भुमिका व धोरण निर्धाणावर त्यांचा होणारा परीणाम महाराष्ट्रातील समाज कल्याण कार्यक्रम महिला व बालकामगार व युवक, अशासकीय संघटना व समाजकल्याणमधील त्यांची भुमिका.

**८. प्रसार माध्यमे :** मुद्रण व इलेक्ट्रॉनिक प्रसार माध्यमे – धोरण निर्धारणावर त्यांचा होणारा परिणाम, जनमत तयार करणे व लोकजागृती करणे भारतीय वृत्तपत्र परिषद (प्रेस काऊन्सिल ऑफ इंडिया) भारतासारख्या धर्मनिरपेक्ष लोकशाहीमधील जनसंपर्क प्रसारमाध्यमासाठी आचारसंहिता; मुख्य प्रवाहातील जनसंपर्क प्रसारमाध्यमातील महिलांचा सहभाग : वस्तुस्थिती व मानके; भाषण व अभिव्यक्ती स्वातंत्र्य आणि त्यावरील मर्यादा.

**९. निवडणूक प्रक्रिया:** निवडणूक प्रक्रियेची ठळक वैशिष्ठये– एक सदस्यीय प्रादेशिक मतदारसंघ, दुर्बल घटकांकरीता राखीव मतदारसंघ, प्रौढ मताधिकार निवडणूक आयोगाची भूमिका – सार्वत्रिक विडणूका – प्रमुख कल – मतदान वर्तनाचे स्वरूप आणि मतदान वर्तनावर प्रभाव पाडणारे घटक – खुल्या व नि:पक्ष वातावरणात निवडणूका घेण्यामधील समस्या व अडचणी – निवडणूकविषयक सुधारणा– इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्रे.

**१०. प्रशासनिक कायदा:** कायद्याचे राज्य, प्रशासकीय स्वेच्छनिर्णय आणि त्याचे नियंत्रण व न्यायिक आढावा. प्रशासनिक न्यायाधिकरणे, त्यांची स्थापना व कार्यशीलता, नैसर्गिक न्यायाची तत्वे.

**११. केंद्र सरकारचे व राज्य शासनाचे विशेषधिकार :** भारतीय साक्षीपुरावा अधिनियमाचे कलम १२३, शासकीय गुपिते अधिनियम,माहितीचा अधिकार आणि शासकिय गुपिते अधिनियमावर त्याचा होणारा परिणाम.

**१२. काही सुसंबध्द कायदे :** **(१) पर्यावरण (संरक्षण) अधिनियम, १९८६ :** उदिष्टे, यंत्रणा व त्यात दिलेल्या उपाययोजना,

**(२) ग्राहक संरक्षण अधिनियम, १९८६ :** व्याख्या– ग्राहक विवाद – निवारण यंत्रणा

**(३) माहीतीचा अधिकार अधिनियम, २००५ :** अपीलकर्त्यांचे अधिकार, सार्वजनिक प्राधिकरणाचे कर्तव्य, माहीती मधील अपवाद.

**(४) माहीती तत्रज्ञान अधिनियम : २००० (सायबरविषयक कायदा):** व्याख्या प्राधिकरणे – अपराध

**(५) भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम :** उदिष्ट, यंत्रणा व त्यात दिलेल्या उपाययोजना.

**(६) अनुसूचित जाती व अनुसूचित जनजाती (अत्याचार प्रतिबंध) अधिनियम, १९८९:** उदिदष्ट, यंत्रणा व त्यात दिलेल्या उपाययोजना

**(७) अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती (अत्याचार प्रतिबंध) अधिनियम, १९९५:** उदिदष्ट, यंत्रणा व त्यात दिलेल्या उपाययोजना.

**(८) नागरी हक्क संरक्षण अधिनियम, १९५५:** उदिदष्ट, यंत्रणा व त्यात दिलेल्या उपाययोजना

**१३. समाज कल्याण व सामाजिक विधिविधान:** सामाजिक बदलाचे साधन म्हणून सामाजिक विधीविधान; मानवी हक्क; भारताचे संविधान व फॉजदारी कायदा (फौजदारी प्रक्रिया संहिता) घरगुती हिंसाचार (प्रतिबंध) अधिनियम, नागरी हक्क संरक्षण, अधिनियम १९५५, अनुसूचित जाती आणि अनुसूचित जमाती (अत्याचार प्रतिबंध) अधिनियम, १९८९ आणि माहीतीचा अधिकार अधिनियम २००५ अतंर्गत महिलांना संरक्षण.

**१४. सार्वजनिक सेवा:** अखिल भारतीय सेवा, सांविधानिक दर्जा, भूमिका व कार्ये; केंद्रीय सेवा: स्वरूप व कार्ये: केंद्रीय लोकसेवा आयोग; राज्य सेवा व महाराष्ट्र राज्य लोकसेवा आयोग; शासन व्यवहाराच्या बदलत्या संदर्भात प्रशिक्षण – यशदा, लाल बहदूर शास्त्री प्रशासन अकादमी, सरदार वल्लभभाई पटेल राष्ट्रीय पोलीस अकादमी.

**१५. सरकार खर्चावर नियंत्रण:** संसदीय नियंत्रण, अंदाज समिती, लोकलेखा समिती, सार्वजनिक उपक्रमांवरील समिती, भारताचे नियंत्रक व महालेखा परिक्षक (कॅग) यांचे कार्यालय, पैसाविषयक व राजकाषीय धोरणामधील वित मंत्रालयाची भूमिका, महालेखापाल महाराष्ट्र यांची रचना व कार्य.

## सामान्य अध्ययन – तीन
## मानव संसाधन विभाग आणि मानवी हक्क

**दर्जा** :– पदवी **एकूण गुण** : 150

**प्रश्नपत्रिकेचे स्वरूप** – वस्तुनिष्ठ **कालावधी** : २ तास

**टीप :**

(१) प्रश्नपत्रिकेतील प्रश्नांचे स्वरूप आणि दर्जा अशा प्रकारचा असेल की, एखादी सुशिक्षित व्यक्ती कोणताही विशेष अभ्यास न करता उत्तर देऊ शकेल; विविध विषयातील उमेदवारांच्या सामान्यज्ञानाची चाचणी घेणे हा त्याचा उद्देश आहे.

(२) उमेदवारांनी खाली नमूद केलेल्या विषयांतील / उपविषयांतील अद्ययावत व चालू घडामोडींचा अभ्यास करणे अपेक्षित आहे.

---

**१. मानव संसाधन विभाग**

**१.१.भारतातील मानव संसाधन विभाग:** भारतातील लोकसंख्येची सद्यस्थिती – संख्यात्मक स्वरूप ( आकारमान आणि वाढ – लिंग वय नागरी आणि ग्रामीण) आणि गुणत्मक स्वरूप (शिक्षण व आरोग्य विषयक काळजी), लोकसंख्येविषयक धोरण आणि २०५० पर्यंतच्या योजना, आधूनिक समाजातील मानव संसाधन नियोजनाचे महत्व आणि गरज, मानव संसाधन नियोजनामध्ये अतर्भूत असलेले घटक आणि कारणीभूत गोष्टी, भारतातील बेरोजगारीतील स्वरूप, प्रकार आणि समस्या, भारतातील सेवा योजनांचा कल विभिन्न विभागातील व क्षेत्रातील कुशल कामगारांचे मागणी दर, मनुष्यबळ विकासाकरीता कार्यरत असलेल्या शासकिय आणि स्वयंसेवी संघटना उदा. एनसीईआरटी, एनआयईपीए, विद्यापीठ अनुदान आयोग (युजीसी), मुक्त विद्यापीठे, एनआयसीटीई, एनसीटीई, आयटीआय, एनसीव्हीटी, आयएमसी इत्यादी, मानव संसाधन विकासाशी संबधित समस्या आणि बाबी, शासनाचे नोकरीविषयक धोरण, बेरोजगारी आणि न्यून बेरोजगारी कमी करण्यासाठी विविध योजना.

**१.२.शिक्षण:** मानव संसाधन विकासाचे आणि सामाजिक बदलाचे साधन म्हणून शिक्षणाचा विचार, भारतातील (पूर्व प्राथमिक ते उच्च शिक्षण) शिक्षण प्रणाली (शिक्षणाचे सार्वत्रिकीरण, शिक्षणाचे व्यावसायिकीकरण, दर्जावाढ, गळतीचे प्रमाण इत्यादी) समस्या अणि प्रश्न, मुलींकरीता शिक्षण, सामाजिकदृष्टया व आथिदृष्टया गरीब वर्ग, अधू, अल्पसंख्यांक, कौशल्य शोध इत्यादी, शासनाची शैक्षणिक धोरणे, योजना व कार्याक्रम, अनौपचारीक, औपचारिक आणि प्रौढ शिक्षणाचा प्रसार विनियमन आणि सनियंत्रण करणाऱ्या शासकीय व स्वयंसेवी संस्था, ई – अध्ययन, जागतिकीकरण आणि खजगीकरण याचा भारतीय शिक्षणावरील परिणाम,राष्ट्रीय ज्ञान आयोग, राष्ट्रीय उच्च शिक्षण व संशोधन आयोग, आयआयटी, आयआयएम, एनआयटी.

**१.३. व्यावसायिक शिक्षण:** मानव संसाधन विकासाचे साधन म्हणून व्यावसायिक शिक्षणाचा विचार, व्यावसायिक/तंत्र शिक्षण – भारतातील, विशेषत: महाराष्ट्रातील सद्यस्थिती, शिक्षणप्रणाली व प्रशिक्षण, शासकिय धोरणे, योजना व कार्यक्रम – समस्या, प्रश्न व त्यावर मात करण्यासाठी प्रयत्न, व्यावसायिक आणि तंत्र शिक्षणाचा प्रसार,, विनियमन करणाऱ्या आणि अधिस्वीकृती देणाऱ्या संस्था.

**१.४.आरोग्य:** मानव संसाधन विकासाच्या अत्यावश्यक आणि प्रमुख घटक म्हणून आरोग्याचा विचार, जीवनविषयक आकडेवारी, जागतिक आरोग्य संघटना – उददेश, रचना कार्य व कार्यक्रम, भारतामध्ये शासनाची आरोग्य विषयक धोरणे, योजना आणि कार्यक्रम, आरोग्य विषयक काळजी घेणारी यंत्रणा, आरोग्याशी संबंधित समस्या आणि त्यावर मात करण्यासाठी करावयाचे प्रयत्न, जननी – बालसुरक्षा योजना, राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना.

१.५.**ग्रामीण विकास:** पंचायत राज व्यवस्थेला अधिकार प्रदान करणे, ग्राम पचायत आणि ग्राम विकासातील तिची भूमिका, जमीन सुधारण व विकास, ग्रामविकासामध्ये अंतर्भूत असणाऱ्या वित्तीय संस्था, ग्रामीण रोजगार योजना, ग्रामीण पाणीपुरवठा व स्वछता कार्यक्रम, ग्रामीण क्षेत्रातील पायाभूत विकास उदा. ऊर्जा, परिवहन, गृहनिर्माण व दळणवळण, राष्ट्रीय ग्रामीण हमी योजना.

**२. मानवी हक्क:**

**२.१. जागतिक मानवी हक्क प्रतिज्ञानपत्र (युडीएचआर १९४८)** : मानवी हक्काची आतराष्ट्रीय मानके, त्याचे भारताच्या संविधानातील प्रतिबिंब, भारतात मानवी हक्क राबविण्याची आणि त्याचे संरक्षण करण्याची यंत्रणा, भारतातील मानवी हक्क चळवळ, मानवी हक्कापासून वंचित असलेल्यांच्या समस्या जसे गरीबी, निरक्षरता, बरोजगारी, सामाजिक – सांकृतिक – धार्मिक प्रथा, हिंसा, भ्रष्टाचार, दहशदवाद, कामगारांचे शोषण, हवालतीतील गुन्हेगारी इत्यादी. लोकशाही चौकटीत मानवी हक्क आणि मानवी सभ्येतेचे पालन करण्यासाठी प्रशिक्षण देण्याची गरज, जागतिकीकरण आणि त्याचा विभिन्न क्षेत्रांवरील परिणाम, मानवी विकास निर्देशांक, बालमृत्यू प्रमाण, लिंग गुणोत्तर.

**२.२ बाल विकास :** समस्या व प्रश्न (अर्भक मृत्यूसंख्या, कुपोषण, बाल कामगाार, मुलांचे शिक्षण इत्यादी) शासकिय धोरणे, कल्याण योजना आणि कार्यक्रम आंतराष्ट्रीय अभिकरणे, स्वयंसेवी संघटना, सामूहिक साधने यांची भूमिका, लोककल्याणामध्येलोकांचा सहभाग.

**२.३ महिला विकास**: समस्या व प्रश्न (स्त्री पुरूष असमानत, महिला विरोधी हिंसाचार, स्त्री अभ्रक हत्या/ स्त्रीभ्रूण हत्या महिलांचे सबलीकरण इत्यादी) शासकिय धोरण, विकास/ कल्याण व सबलीकरण यासाठी योजना व कार्यक्रम, आंतराष्ट्रीय संस्था, स्वयंसेवी संघटना यांची भूमिका आणि सामुहिक साधने, लोकविकासामध्ये लोकांचा सहभाग, आशा.

**२.४. युवकांचा विकास :** समस्या व प्रश्न (बेरोजगारी, असंतोष, अंमली पदार्थाचे व्यसन इत्यादी) शासकिय धोरण– विकास योजना व कार्यक्रम– आंतराष्ट्रीय संस्था, स्वयंसेवी संघटना याची भूमिका आणि सामूहिक साधने, लोकविकासातील लोकांचा सहभाग.

**२.५. आदिवासी विकास:** समस्या व प्रश्न (कुपोषण, अलिप्तता, एकात्मीकरण व विकास इत्यादी) आदिवासी चळवळ– शासकीय धोरण, कल्याण योजना व कार्यक्रम– आंतरराष्ट्रीय संस्था, स्वयंसेवी संघटना व सामूहिक साधने यांची भूमिका, लोककल्याणामध्ये लोकांचा सहभाग.

**२.६. सामाजिकदृष्टया वंचित वर्गाचा विकास (अ.जा.,अ.जा/भ.ज,इतर मागासवर्ग इत्यादी) :** समस्या व प्रश्न (संधीतील असमानता इत्यादी) – शासकिय धोरण, कल्याण योजना व विकास कार्यक्रम, आंतराष्ट्रीय संस्था, स्वयंसेवा संघंटना व साधन संपत्ती संघटीत करून कामी लावणे व सामूहिक सहभाग

**२.७. वयोवृध्द लोकांचे कल्याण:** समस्या व प्रश्न – शासकीय धोरण– कल्याण योजना व कार्यक्रम, आंतराष्ट्रीय संस्था, स्वयंसेवी संघटना यांची भूमिका आणि वयोवृध्दांच्या विकासासाठी सामूहिक सहभाग, विकासविषयक कार्यक्रमामध्ये त्यांच्या सेवांचे उपयोजन.

**२.८. कामगार कल्याण:** समस्या व प्रश्न ( कामाची स्थिती, मजुरी, आरोग्य आणि संघटित व असंघटित क्षेत्रांशी संबंधित समस्या) शासकीय धोरण, कल्याण योजना व कार्यक्रम– आंतरराष्ट्रीय संस्था, समाज व स्वयंसेवी संघटना.

**२.९. विकलांग व्यक्तीचे कल्याण :** समस्या व प्रश्न (शैक्षणिक व रोजगार संधी यामधील असमानता इत्यादी) शासकीय धोरण, कल्याण योजना व कार्यक्रम रोजगार व पुनर्वसन यामधील आंतरराष्ट्रीय संस्था, स्वयंसेवी संघटना यांची भूमिका.

**२.१०. लोकांचे पुनर्वसन (विकास प्रकल्प व नैसर्गिक आपत्ती यांमुळे बाधित लोक) :** कार्यतंत्र धोरण व कार्यक्रम – कायदेविषयक तरतूदी– आर्थिक सांस्कृतिक, सामाजिक, मानसशास्त्रीय इत्यादीसारख्या निरनिराळया पैलूंचा विचार.

**२.११. आंतरराष्ट्रीय व प्रादेशिक संघटना: संयूक्त राष्ट्रे आणि तिची विशेषीकृत अभिकरणे**– युएनसीटीएडी, यूनडीपी, आयसीजे, आयएलओ, यूनिसेफ, युनेस्को, यूएनसीएचआर, इयु, अँपेक, एशियन, ओपेक, ओएयु, सार्क, नाम, राष्ट्रकुल राष्ट्रे (कॉमनवेल्य ऑफ नेशन्स) आणि युरोपियन युनियन.

**२.१२. ग्राहक संरक्षण:** विद्यामान अधिनियमाची ठळक वैशिष्टये – ग्राहकाचें हक्क– ग्राहक विवाद व निवारण यंत्रणा, मंचाचे निरनिराळे प्रकार– उदिष्टये, अधिकार, कार्ये, कार्यपध्दती, ग्राहक कल्याण निधी.

**२.१३. मुल्ये व नीतितत्वे:** कुटूंब, धर्म, शिक्षण, प्रसारमाध्यमे इत्यादी यांसारख्या औपचारिक व अनौपचारिक संस्था मार्फत सामाजिक मानके, मूल्ये, नीतितत्वे, नीतितत्वे यांची जोपासना करणे.

## सामान्य अध्ययन – चार

## अर्थव्यवस्था व नियोजन, विकासविषयक अर्थशास्त्र आणि कृषि, विज्ञान व तंत्रज्ञान विकास

**दर्जा** :– पदवी **एकूण गुण** : 150

**प्रश्नपत्रिकेचे स्वरूप** – वस्तुनिष्ठ **कालावधी** : २ तास

**टीप :**

(१) प्रश्नपत्रिकेतील प्रश्नांचे स्वरूप आणि दर्जा अशा प्रकारचा असेल की, एखादी सुशिक्षित व्यक्ती कोणताही विशेष अभ्यास न करता उत्तर देऊ शकेल; विविध विषयातील उमेदवारांच्या सामान्यज्ञानाची चाचणी घेणे हा त्याचा उद्देश आहे.

(२) उमेदवारांनी खाली नमूद केलेल्या विषयांतील / उपविषयांतील उद्ययावत व चालू घडामोडींचा अभ्यास करणे अपेक्षित आहे.

---

**१. अर्थव्यस्था व नियोजन–**

१.१ **भारतातीय अर्थव्यवस्था:** भारतीय अर्थव्यस्थेमधील आव्हाने– गरिबी, बेरोजगारी व प्रादेशिक असमतोल, नियोजन : प्रक्रिया प्रकार, भारताच्या पहिल्या ते दहव्या पंचवार्षिक योजनांचा आढावा, मूल्यमापन विकासाचे सामाजिक व आर्थिक निदर्शक, राज्य व स्थानिक स्तरावरील नियोजन, विकेंद्रीकरण– संविधानातील ७३ वी व ७४ सुधारणा.

१.२ **नागरी व ग्रामीण पायाभूत सुविधांचा विकास :** गरजा व महत्व, ऊर्जा, पाणीपुरवठा व स्वच्छता, गृहनिर्माण, परिवहन (रस्ते, बंदरे इ.), संसूचना (टपाल व तारायंत्र, दुरसंचार), रेडिओचे नेटवर्क, दुरचित्रवाणी, इंटरनेट महाजाल अशा सामाजिक व आर्थिक पायाभूत सुविधांची वाढ विकास. भारतातील पायाभूत सुविधांशी संबधित पेचप्रसंग व समस्या, धोरण, पर्याय सरकारी खासगी क्षेत्रातील भागीदारी (पीपीपी), भारतीय वित विकास व पायाभूत सुविधांच्या विकासासाठी केंद्र सरकारची व राज्य शासनाची धोरणे, परिवहन व गृहनिमार्ण (नागरी व ग्रमीण) समस्या – केंद्र सरकारचे व राज्य शासनाचे उपक्रम व कार्यक्रम, बीओएलटी (बांधा, वापरा, भाडेपटयाने द्या, हस्तांतरीत करा) व बीओटी (बांधा, वापरा व हस्तांतरित करा) योजना.

१.३ **उद्योग– गरजा:** आर्थिक व सामाजिक विकासात उद्योगाचे महत्व व भूमिका वाढीचा आकृतिबंध, विशेषत: महाराष्ट्राच्या संदर्भात भारतातील मोठया उद्योगांची संरचना, लघुउद्योग, कुटीर व ग्रामोद्योग, त्यांच्या समस्या व दृष्टिकोन, शिथिलीकरण, खाजगीकरण व जागतिकीकरण यांचे लघुउद्योगांवरील परिणाम, लघुउद्योगांचा विकास, प्रचालन व संनियंत्रण यांकरीता महाराष्ट्राचे धोरण, उपाययोजना व कार्यक्रम, लघुउद्योग व कुटीर उद्योग यांची निमार्ण संभाव्यता, विशेष आर्थिक क्षेत्र (एसईझेड), एसजीवीएस.

१.४ **सहकार:** सहकाराची संकल्पना, अर्थ, समुदिष्ट, जुनी व नवीन तत्वे , भारतातील सहकार चळवळीची वाढ व विविधीकरण, महाराष्ट्रातील सहकारी संस्था– प्रकार, भुमिका महत्व व विविधीकरण, राज्यधोरण व सहकार क्षेत्र – विधानमंडळ, पर्यवेक्षण, लेखापरीक्षण व सहाय्य, महाराष्ट्रीतील सहकारी संस्थांच्या समस्या जागतिक स्पर्धेच्या युगात सहकारी संस्थांचे भवितव्य, महाराष्ट्रातील सहकार चळवळीचा आढावा, सुधारणा व भवितव्या– कृषि पणन यातील पर्यायी धोरणविषयक व उपक्रमशीलता– रोजगार हमी योजना.

१.५ **आर्थिक सुधारणा**– पार्श्वभूमी, शिथिलीकरण, खाजगीकरण व जागतिकीकरण –(संकल्पना, अर्थ, व्याप्ती व मर्यादा), केंद्र व राज्य स्तरावरील आर्थिक सुधारणा, जागतिक व्यापार संघटनेची मुदत, तरदूदी व त्यांची अमलबजावणी आणि भारतीय अर्थव्यवस्थेवरील त्याचा परिणाम व समस्या.

१.६ **आंतराष्ट्रीय व्यापार व आंतराष्ट्रीय भांडवली चळवळ –** जागतिकीकरणच्या युगात उद्यास आलेला कल, भारतीय जागतिक व्यापाराची वाढ, रचना व निदेश, भारताचे विदेश व्यापार धोरण – निर्मीतीचे प्रचालन, जागतिक व्यापार संघटना व आंतराष्ट्रीय व्यापार– विदेशी भांडवल, आंतरर्देशी प्रवाह –रचना व वाढ एफडीआय (भारतीय वित्त विकास) ई वाणिज्य, बहुराष्ट्रीय व्यापार धोरण निर्मीतीचे वाढ एफडीआय (भारतीय वित विकास) ई वाणिज्य, बहूराष्ट्रीय – आंतराष्ट्रीय, वित्तव्यवस्था,अभिकरणाची भूमिका (आंतराष्ट्रीय नाणे निधी), जागतिक बॅंक व आंतरराष्ट्रीय विकास अभिकरण, आंतरराष्ट्रीय पत आकराणी.

१.७ **गरीबीचे निर्देशांक व अंदाज:** दारिद्रय रेषा– संकल्पना व वस्तुस्थिती, दारिद्रयरेषेखालील, दारिद्रय निर्मूलनाच्या उपाययोजना भारतातील जननक्षमता, विवाहदर, मृत्यु संख्या व रोगटपणा–लिंग सक्षमीकरण धोरण.

१.८ **रोजगार निर्धारणाचे घटक:** बेरोजगारी संबधात उपाययोजना – उत्पन्न, दारिद्रय व रोजगार यांच्यामधील संबंध– वितरणासंबंधी प्रश्न व सामाजिक न्याय.

१.९ **महाराष्ट्रची अर्थव्यवस्था–** कृषि उद्योग व सेवा क्षेत्रांची ठळक वैशिष्टये– महाराष्ट्रातील दुष्काळ व्ययवस्थापन– महाराष्ट्रातील एफडीआय.

**२. विकास व कृषि यांचे अर्थशास्त्र**

**२.१ .समष्टि अर्थशास्त्र–** राष्ट्रीय उत्पन्न लेखांकनाच्या पध्दती–पैशांची कार्ये– आधार पैसा– जननक्षम पैसा – पैशांचा संख्या सिध्दांत– पैसा गुंणक, चलनवाढीचे पैसाविषयक व पैसावितिरीक्त सिध्दांत– चलन वाढ नियंत्रण: चलन विषयक, आर्थिक आणि थेट उपाययोजना.

२.२ **सार्वजनिक वित्तव्यवस्था आणि वित्तीय संस्था:** पणन अर्थव्यवस्थेमध्ये सार्वजनिक वित्तव्यवस्थेची भूमिका– सरकारी गुंतवणूकीचे निकष गुण वस्तू व सार्वजनिक वस्तू– महसूलीचे स्त्रोत व खर्च (केंद्र व राज्य)–करांचे स्वरूप व अर्थसाहाय्य आणि त्यांचा भार व परिणाम– केंद्राचे व भारतातील राज्यांचे कर, करेतर व सरकारी ऋण. सरकारी खर्च (केंद्र व राज्ये) – वाढ व त्याची कारणे– सरकारी खर्च सुधारणा– कामगिरी आधारीत अर्थसंकल्पन– शून्याधारित अर्थसंकल्प –अर्थसंकल्पीय तुटीचे प्रकार देशांतर्गत आणि देशाबहेरील कर्ज, राष्ट्रीय व राज्य स्तरावरील कर सुधारणांचे पुर्णविलोकन– मुल्यवर्धित कर. सरकारी ऋण, वाढ, रचना व भार, केंद्राला असणारी राज्याची कर्जाची समस्या, राजकोषीय तूट– तुटींची संकल्पना आणि नियंत्रण– केंद्र राज्य आणि भारतीय रिझर्व्ह बॅंकेचा पुढाकार, भारतातील राजकोषीय सुधारणा– केंद्र व राज्य स्तरावरील आढावा, वित्तीय क्षेत्र सुधारणा– बॅंकींग क्षेत्रातील नवीन प्रवाह– खरेखुरे आणि नाममात्र व्याजदर – रेपो आणि प्रतिकुल रेपो व्यवहार.

**२.३ वाढ, विकास व आंतराष्ट्रीय अर्थशास्त्र:**

१. **विकास निदर्शक**: सातत्यपुर्ण विकास, विकास व पर्यावरर्ण, हरित स्थूल, देशांतर्गत उत्पन्न
२. **आर्थिक विकासाचे घटक**: नैसर्गिक साधनसंपत्ती, लोकसंख्या, मानवी भांडवल, पायाभूत सुविधा– लोकसंख्याशास्त्रीय संक्रमणाचा सिध्दांत– मानवी विकास निर्देशांक– मानवी दारिद्रय निर्देशांक– लिंग सक्षमीकरण उपाययोजना.
३. वाढीमधील विदेशी भांडवलीची आणि तंत्रज्ञानाची भूमिका, बहुराष्ट्रीय महामंडळे.
४. वाढीचे इंजिन म्हणून आंतराष्ट्रीय व्यापार– आंतराष्ट्रीय व्यापाराचे सिध्दांत.
५. आयएमएफ– आयबीआरडी–डब्ल्युटीओ–प्रादेशि व्यापार करारनामा–सार्क–एएसईएएन

**२.४ भातीय कृषिव्यवस्था, ग्राम विकास सहकार:**

१. आर्थिक विकासातील कृषिक्षेत्राची भूमिका– कृषि, उद्योग व सेवाक्षेत्रे यांच्यामधील आंतरसंबध– कंत्राटी शेती– ठराविक शेती–औद्योकि शेती–सेंद्रीय शेती.
२. धारण केलेल्या जमिनीचा आकार आणि उत्पादकता– हरित क्रांती व तंत्रशास्त्राविषयक बदल कृषिविषयक किंमती आणि व्यापाराच्या अटी– शेतीला अर्थसहाय्य–सार्वजनिक वितरण व्यवस्था– अन्नसुरक्षा.
३. भारतातील कृषि उत्पन्न वाढीतील प्रादेशिक तफावत – कृषिविषयक धंदा व जागतिक बाजारपेठ– भारतातील कृषिविषयक पतवारी
४. पाटबंधाऱ्याची साधने व जल व्यवस्थापन– पशुधनसंपत्ती व त्याची उत्पादकता, भारतातील आणि महाराष्ट्राला धवल क्रांती, मत्स्यव्यवसाय, कुकुटपालन, वनीकरण, फलोत्पादन व पुष्पसंवर्धन विकास.
५. योजना कालावधी मधील ग्रामीण विकासाची धोरणे– ग्रामीण पायाभूत सोयी ( सामाजिक व आर्थिक).
६. जगतिक व्यापार संघटना व शेती – शेतकऱ्यांचे व पैदासकारांचे हक्क – जैवविविधता–जीएम तंत्रज्ञान, कृषि बाजारपेठेतील गॅट (जागतिक व्यापार संघटना) चा अपेक्षित भार.
७. शेतीसाठी लागणारे साहित्य व उत्पादन यांचे विपणन व मुल्यांकन, किंमतीतील चढउतार आणि त्यांच्या किंमती, कृषि अर्थव्यवस्थेतील सहकारी संस्थांची भूमिका.

**२.५ कृषि:**

१. **राष्ट्रीय अर्थव्यवस्थेत कृषिचे महत्व:** कमी उत्पादकतेची कारणे आणि कृषिविषयक उत्पादन व जमिन सुधारणा व जमिनीचा वापर; मृद व जलसंधारण, पर्जन्याश्रयी शेती यासारख्या विकास कामांकरीता सिंचन आणि त्याच्या पध्दती शेतीचे यांत्रिकीकरण, आयसीएआर, एमसीएईआर यांची भूमिका.
२. **ग्रामीण कर्जबाजारीपणा, कृषि पतवारीची समस्या:** गरज, महत्व व त्यात गुंतलेल्या वित्तीय संस्था, नाबार्ड व भूविकास बॅंक – कृषि किंमती – घटक, विविध कृषि उत्पादनावर परिणाम करणारे घटक – विविध कृषि विषयक उत्पादने यांच्या शासकिय आधारभूत किंमती, अर्थसहाय, कृषि पणन – सद्यस्थिती, मूल्यवर्धित उत्पादने, शासनाची भूमिका आणि कृषि पणनातील त्यांच्या संस्था (एपीसी, एपीएमसी, इ.)

**२.६ अन्न व पोषणआहार :** भारतातील अन्न उत्पादन व खप यामधील कल पहिली व (नंतर) घडणारी दुसरी हरित क्रांती, अन्न स्वावलंबन, अन्न सुरक्षिततेमधील समस्या, साठवणूकीतील समस्या व प्रश्न, प्रापण, वितरण, अनाची आयात व निर्यात, अन्नाचे कॅलरी मूल्य व

त्याची मोजणी, चांगले आरोग्य व समतोल आहारासाठी मानवी शरीरास आवश्यक असलेली ऊर्जा व पोषण मूल्य भारतातील नेहमीच्या पोषणविषयक समस्या आणि त्याची कारणे व परिणाम, शासनाची धोरणे, योजना व पीडीएस यासारखे कार्यक्रम, कामासाठी अन्ना, दुपारचे भोजन योजना व इतर पोषणविषयक कार्यक्रम, प्रस्तावित अन्न सुरक्षा अधिनियम.

**२.७ भारतीय उद्योग पायाभूत सुविधा व सेवा क्षेत्र:**

१. कल, उद्योगाची रचना व वाढ, भारतातील पायाभूत सुविधा व सेवा क्षेत्र– लोकांची भूमिका, भारतातील खाजगी व सहकारी क्षेत्र– लघुउद्योग व कुटीर उद्योग, बीपीओ.

२. भारतातील उद्योगधंदयामधील उदारमतवाद आणि त्याचे परिणाम – उद्योगातील आजीरीपण.

**३. विज्ञान व तंत्रज्ञान विकास**

३.१ **ऊर्जा**: पारंपरिक व अपारंपारिक ऊर्जा साधने – सौर, वारा, जैववायू, जीववस्तुमान, भूऔष्णिक व इतर नवीकरणयोग्य ऊर्जा साधनांची संभाव्यता, सौर साधने म्हणजेच सौर कुकर, पाणी तापक इ. नव्याने सुरूवात, जैववायू (बायोगॅस) तत्वे व प्रक्रिया, ऊर्जा संकटाची समस्या, शासकीय धोरणे आणि वीज निर्मितीसाठी कार्यक्रम अणुशक्ती कार्यक्रम, औष्णिक वीज कार्यक्रम, जलविधुत कार्यक्रम, वीज वितरण व राष्ट्रीय विधुत पुरवठा, ऊर्जा सुरक्षा, संशोधन व विकास यात गुंतलेली अभिकरणे व संस्था.

३.२ **संगणक व माहिती तंत्रज्ञान:** आधूनिक समाजातील संगणकाची भूमिका आणि माहितीची देवाण घेवाण, नेटवर्कींग व वेबतंत्रज्ञान यांसारख्या जीवणाच्या विविध क्षेत्रांमधील त्याचे उपाययोजन, सायबर गुन्हे व त्यावरील प्रतिबंध, विविध सेवांमधील माहिति तंत्रज्ञानाचा वापर, मिडीया लॅब आशिया, विद्या वाहिनी, ज्ञान वाहीनी, कम्यूनिटी माहीती केंद्र इ. सारखे शासकिय कार्यक्रम, माहिति तंत्रज्ञान उद्योगातील महत्वाचे प्रश्न त्याचे भवितव्य.

३.३ **अवकाश तंत्रज्ञान:** भारतीय अवकाश कार्यक्रम, दुरसंचार, दुरदर्शन, शिक्षण, प्रसारण, हवामान अंदाज, जीपीएस, आपत्ती इशारा याकरीता भारतीय कृत्रिम उपग्रह, भारतीय क्षेपणास्त्र कार्यक्रम इ., सुदूर संवेदना, भौगोलिक माहिति यंत्रणा (जीआयएस) आणि हवामान अंदाज, आपत्ती इशारा यामधील तिचे उपयोजन, जल, मृद, खनिज संपत्ती विकास, कृषि व मत्स्यविकास, नागरी नियोजन, परिस्थितीकी अभ्यासक्रम, भौगोलिक यंत्रणा.

३.४ **जैव तंत्रज्ञान:** कृषि, औद्योगिक विकास व रोजगार निर्मितीद्वारे मानवी जीवन व राष्ट्रीय अर्थव्यस्था सुधारणासाठी संभाव्य शक्यता, नैसर्गिक साधनसंपत्ती विकासाचे आवश्यक व महत्वाचे साधान म्हणून जैव तंत्रज्ञान उपायोजनाची क्षेत्र– कृषि, पशु, पैदास व पशुवैद्यकीय आरोग्य केंद्र, औषधीनिमार्णविद्या, मानवी आरोग्य केंद्र तंत्रज्ञान, ऊर्जा निर्मीती, पर्यावरण संरक्षण इ., देशातील जैवतत्रज्ञानाबाबत प्रचालन, नियमन व विकास यांमधील शासनाची भुमिका व प्रयत्न, जैवतंत्रज्ञानाच्या विकासाशी संबधित नैतिक, सामाजिक व कायदेशीर प्रश्न, जैव तंत्रज्ञान विकासाचे शक्य ते प्रतिकुल परिणाम, बियाणे तंत्रज्ञान, त्याचे महत्व, बियाणांची गुणवत्ता, बियाणांचे विविध प्रकार आणि त्यांचे बियाणे उत्पादन व प्रक्रिया तंत्रे, बी.टी कापूस, बीटी. वांगे इ.

३.५ **भारताचे आण्विक धोरण:** ठळक वैशिष्टये, ऊजेचा स्त्रोत म्हणून अणुऊर्जा आणि स्वच्छ ऊर्जा म्हणून त्याचे महत्व, आण्विक टाकाऊ कचऱ्याची समस्या, भारतातील औष्णिक वीज निर्मिती, एकूण वीज निमिर्तीमधील त्याचे अंशदान, आण्विक चाचणी निर्धारके: पोखरण एक (१९७४) आणि पोखरण दोन (१९९८) न्युक्लिअर नॉन – प्रोलिफरेशन ट्रिएटी आणि कॉप्रेहेंसिव टेस्ट बॅन ट्रिएटी यांसारख्या आण्विक धोरणाबाबतचा अलिकडला कल, २००९ चा इंडो– युएस न्युक्लिआर करार.

३.६ **आपत्ती व्यवस्थापन:** आपत्तीची व्याख्या, स्वरूप, प्रकार व वर्गीकरण, नैसर्गिक धोके, कारणीभूत घटक व ते सौम्य करणारी उपायोजना, पूर, भूकंप, त्सूनामी, दरड कोसळणे इ. सौम्य करणाऱ्या उपाययोजनांवर परिणाम करणारे घटक, किल्लारी (१९९३), भूज (२००१), सिक्कीम – नेपाळ (२०११) भूकंन तसेच बंदा आले (२००४) (सुमात्रा), फुकुशिमा (२०११) (जपान) व त्सूनामी यांसारख्या मोठया भूकंप व त्सूनामी प्रकरणांचा अभ्यास, महाराष्ट्र २००५ चा मुंबईतील पूर, डिसेंबर १९९३, जून २००६, नोव्हेंबर २००९, जलै २०११ चे २०११ चे बॉम्ब स्फोट आणि अतिरेक्यांचा हल्ला, त्यांचा परिणाम.